# ONE DAY STATE LEVEL WORKSHOP

**DATE- 1ST APRIL 2024**

**THEME- "HOW TO GET GOOD MARKS IN SET EXAM PAPER-1"**

**Program Notice:**



**Program Schedule: (कार्यक्रम  पत्रिका)**

Jaywant Pratishthan Humgaon Sanchalit,

## Amdar Shashikant Shinde Mahavidyalay, Medha.

Tal-Jaoli, Dist – Satara, Maharashtra.
Affiliated to Shivaji University, Kolhapur

In Association with,

## Doodhsakhar Mahavidyalaya, Bidri

## PROGRAM SCHEDULE

**One day State Level Workshop on "How to get good marks for SET exam in Paper-I" 1st Apirl 2024 11: 00AM**

**1.Welcome and Introduction: Dr. Sudhir R. Nagarkar**

Librarian, Amdar Shashikant Shinde Mahavidyalaya, Medha

**2. Message by Hon. Principal Major Dr. Ashok V. Giri Sir**

Principal, Amdar Shashikant Shinde Mahavidyalaya, Medha.

**3. Message by Hon. Principal Dr. Sanjay D. Patil Sir**

Principal, Doodhsakhar Mahavidyalaya, Bidri.

**4. Greetings: Dr. Pramod R. Ghatage Sir**

Vice -Principal, Amdar Shashikant Shinde Mahavidyalaya, Medha.

**5. Resource Person: Mr. Atul R. Nagarkar**

Librarian, Doodhsakhar Mahavidyalaya, Bidri

**6. Vote of Thanks: Dr. Sudhir Nagarkar**

**REPORT: अहवाल**

**दूधसाखर महाविद्यालय बिद्री महाविद्यालयात राज्य स्तरीय ऑनलाइन सेट परीक्षा पेपर -१ कार्यशाळा संपन्न:**

दि. १ एप्रिल २०२४ रोजी शिवाजी विद्यापीठ सलग्नीत दूधसाखर महाविद्यालय बिद्री व आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय मेढा यांच्या सयुक्त विद्यमाने सेट परीक्षा प्रथम पेपर मध्ये जास्त मार्क्स कसे मिळवायचे या विषयावर राज्य स्तरीय कार्यशाळा घेण्यात आली प्रथम दूधसाखर महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एस. डी. पाटील यांनी आपल्या मनोगतात सध्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सेट नेट परीक्षेस व पीएच.डी. प्रवेश परीक्षेत यश मिळविण्यासाठी पेपर १ चा अभ्यास असणे महत्त्वाचे आहे असे अधोरेखित केले. मा. प्राचार्य डॉ. अशोक व्ही. गिरी यांनी आपल्या मनोगतात प्रत्यकाने आयुष्यभर विद्यार्थी राहून नवनवीन ज्ञानार्जन करून आपल्या विषयातील ज्ञानपिपासू असले पाहिजे त्याचा समाजाला कसा उपयोग होईल ते पाहिले पाहिजे. तसेच येणाऱ्या ७ एप्रिल 2024 रोजी होणाऱ्या परीक्षेसाठी सेट परीक्षार्थींना शुभेच्छ्या दिल्या. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रमोद घाटगे सर यांनी अशा प्रकारे होणाऱ्या कार्यशाळा यांचा विद्यार्थांना शैक्षणिक अर्हता व गुणवत्ता वाढसाठी खूप उपयोग होतो असे प्रतिपादन करून सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सेट परीक्षेसाठी शुभेच्छ्या दिल्या. या एक दिवसीय कार्यशाळेसाठी रिसोर्स पर्सन प्रा अतूल नगरकर यांनी सेट पेपर १ या विषयाचा संपूर्ण अभ्यासक्रमाची सोप्यापद्धतीने उजळणी घडवून आणली तसेच संभाव्य प्रश्न कसे सोडवायचे याचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. सुधीर नगरकर यांनी वर्कशॉप चे आयोजन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले. या वर्कशॉपसाठी १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी रजिस्ट्रेशन केले तसेच महाराष्ट्रातील अनेक जिल्हयातून सेट परीक्षार्थींनी सहभाग घेतला.

**Photos:**






Newspaper Clipping:

सकाळ

# दूधसाखर महाविद्यालयात सेट परीक्षेबाबत कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

**बिद्री, ता. २ :** शिवाजी विद्यापीठ संलग्नित दूधसाखर महाविद्यालय बिद्री व आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय मेढा यांच्या संयुक्त विद्यमाने 'सेट परीक्षा प्रथम पेपरमध्ये जास्त गुण कसे मिळवावेत' या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा घेण्यात आली.

प्रथम प्राचार्य डॉ. संजय पाटील यांनी मनोगतात सध्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सेट, नेट परीक्षेस व पीएच.डी. प्रवेश परीक्षेत यश मिळविण्यासाठी पेपर १ चा अभ्यास असणे महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. प्राचार्य डॉ. अशोक व्ही. गिरी म्हणाले, 'प्रत्यकाने आयुष्यभर विद्यार्थी राहून नवनवीन ज्ञानार्जन करून आपल्या विषयात विद्यार्थ्यांनी ज्ञानपिपासू बनावे. त्याचा समाजाला कसा उपयोग होईल पाहावे.' महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रमोद घाटगे यांनी, अशा प्रकारे होणाऱ्या कार्यशाळांचा विद्यार्थांना शैक्षणिक अर्हता व गुणवत्तावाढीसाठी खूप उपयोग होतो असे सांगून विद्यार्थ्यांना सेट परीक्षेसाठी शुभेच्छया दिल्या.

कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रंथपाल प्रा. अतुल नगरकर यांनी सेट पेपर-१ या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमाची सोप्या पद्धतीने उजळणी घडवून आणली. तसेच संभाव्य प्रश्न कसे सोडवावेत, याबाबत मार्गदर्शन केले. मेढा महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. सुधीर नगरकर यांनी कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यशाळेसाठी १०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होत.

Kolhapur, Kopjillha
03/04/2024 Page No. 8

*****